**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर** - 440 022
**दुरध्वनी क्रं.** 0712-2870120-21 CIN: U85300PN2019NPL187405 **ई मेल** mahajyotingp@gmail.com

**जा.क्र.** महाज्योती, नागपूर/आस्था/परिपत्रक/1451/2026-27 **दिनांक** :-12/08/2026

# -:सुधारित परिपत्रक:-

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांच्या मुख्य व मुलाखत परीक्षेकरीता अर्थसहाय्य योजनेचा तपशील

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या खालील परीक्षांच्या मुख्य व मुलाखत परीक्षेकरीता महाज्योती संस्थेद्वारे अर्थसहाय्य प्रदान करण्याकरीता इतर मागास वर्ग, विमुक्त जाती- भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

- परीक्षा - 1. MPSC राज्यसेवा/ इतर गट 'अ' मुख्य परीक्षा
- परीक्षा - 2. MPSC राज्यसेवा/ इतर गट 'अ' व्यक्तिमत्व/मुलाखत चाचणी परीक्षा
- परीक्षा - 3. MPSC महाराष्ट्र दुय्यम सेवा/ इतर गट 'ब' मुख्य परीक्षा
- परीक्षा - 4. MPSC महाराष्ट्र दुय्यम सेवा/ इतर गट 'ब' व्यक्तिमत्व/मुलाखत चाचणी परीक्षा

**पात्रता** :-

1. विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा.
2. विद्यार्थी नॉन क्रिमीलेअर गटातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती - भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गापैकी असावा.
3. विद्यार्थी वरील - 1,2,3 व 4 पुर्व/मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा.

**अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे**:-

1. आधार कार्ड (पुढील व मागील बाजुसहित)
2. जातीचा प्रमाणपत्र (Caste Certificate)
3. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate)
4. परीक्षा- 1,2,3 व 4 पुर्व/मुख्य परीक्षेचा प्रवेश पत्र
5. परीक्षा- 1,2,3 व 4 पुर्व/मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या निकालाची प्रत
   (बैठक क्रमांक ठळक करून देण्यात यावा.)

**अर्ज कसा करावा**:-

1. महाज्योती संस्थेच्या www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील **"Application Invited For Financial Assistance Those Who Qualified For MPSC (State/Other Group A/Secondary Group B) Services Mains & Interview"** यावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
2. अर्जासोबत वरील नमुद कागदपत्रे स्वाक्षांकीत करून स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन अपलोड करावे.

**अटी व शर्ती** :

1. पोस्टाने किंवा ई-मेल द्वारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.
2. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती यांचे राहतील.
3. कोणत्याही माध्यमातुन व अंतिम निवड प्रक्रियेच्या टप्प्यावर विद्यार्थ्यांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे आढळल्यास तो/ती कायदेशीर कार्यवाईस पात्र राहील.
4. विद्यार्थाचे बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न असणे आवश्यक आहे.
5. वरील नमुद सर्व पुर्व व मुख्य परीक्षांचे निकाल जाहिर झाल्याच्या दिनांकापासून पुढील 01 महिन्याच्या कालावधी पर्यंत अर्ज स्विकारल्या जाईल.
6. महाज्योती मार्फत राबविण्यात येणाऱ्या अर्थसहाय्य योजनेअंतर्गत चालु आर्थिक वर्षात विद्यार्थी कोणत्याही एकाच अर्थसहाय्य योजनेचा लाभ घेण्यास पात्र राहील.
7. अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचणी आल्यास केवळ महाज्योतीच्या Call Centre वर पुढील क्रमांकांवर संपर्क साधावा.

   **संर्पक क्रमांक** :- 0712-2870120/21

(स्वा.)
(मिलिंद नारिंगे)
**व्यवस्थापकीय संचालक**
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर